


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २०६ ●रविवार, दि.२६ ऑक्टोबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955




# रुम नंबर ११४ अन् महिला डॉक्टरचा तो शेवटचा कॉल, फलटणच्या हॉटेलमध्ये नेमकं काय घडलं?




**सातारा । प्रतिनिधी**

साताऱ्यातील उपजिल्हा रुग्णालयात कर्तव्यावर असणाऱ्या महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणात नवनवे खुलासे होत आहेत. आता याच आत्महत्या प्रकरणात नवी माहिती समोर आली आहे.

साताऱ्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात महिला डॉक्टरने आत्महत्या प्रकरणात रोज नवनवे खुलासे होत आहेत. या प्रकरणातील आरोपी प्रशांत बनकर याला महिला डॉक्टरने प्रपोज केले होते, पण बनकर याने नकार दिला होता, असा दावा बनकर याच्या बहिणीने केला होता. तर दुसरीकडे महिला डॉक्टरच्या वडिलांनी समोर येत मी माझ्या मुलीला भेटायला गेलो होतो, त्यावेळी एक अनोळखी असलेला धष्टपुष्ट माणूस मला भेटला होता. ही धष्टपुष्ट व्यक्ती कोण आहे ? त्याचा तपास करावा, अशी मागणी मृत डॉक्टरच्या वडिलांनी केला आहे. त्यामुळे महिला डॉक्टरच्या आत्महत्येचा सस्पेन्स जास्तच वाढला आहे. असे असतानाच आता तिने ज्या हॉटेलमध्ये स्वत:सा संपवले आणि ज्या रुममध्ये टोकाचे पाऊल उचलले, त्या रुमचा नंबर समोर आला आहे. याच रुममध्ये तिने आत्म हत्या करण्यापूर्वी तळहातावर निलंबित पीएसआय गोपाळ बदने आणि पोलीस कर्मचारी प्रशांत बनकर यांची नावे लिहिली आहेत. मिळालेल्या माहितीनुसार महिला डॉक्टरने जिथे स्वत:ला संपवले ते फलटण येथील शिवाजीनगर परिसरात आहे. या हॉटेलचे नाव मधुदीप हॉटेल असे आहे. या हॉटेलमधील रुम नंबर ११४ मध्येच महिला डॉक्टरने टोकाचे पाऊल उचलले. दरम्यान, मृत्यूपूर्वी महिला डॉक्टरने शेवटचा फोन कॉल प्रशांत बनकर याला केला होता, असे पोलिसांनी सांगितलेले आहे. असे असताना महिला डॉक्टरने आत्महत्या करण्यापूर्वी हॉटेलच्या रुम नंबर ११४ मध्ये नेमकं काय घडलं, असा सवाल उपस्थित झाला आहे. त्यामुळे पोलीस या प्रकरणाचा छडा कसा लावणार हे पाहणे महत्त्वाचे ठरले आहे.

## पुन्हा अशी दमदाटी केली तर मला शरद पवार म्हणतात!



**बीड । प्रतिनिधी**

लोणावळा येथे आयोजित केलेल्या बैठकीला नेत्यांनी जाऊ नये म्हणून अजित पवार गटाचे आमदार सुनिल शेळके यांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना दमदाटी केली. यावरून राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी पुन्हा अशी दमदाटी केली तर मला शरद पवार म्हणतात अशा शब्दात सुनील शेळके यांना खडसावले. लोणावळयातील सभेत बोलताना शरद पवार म्हणाले, भाजपकडून सत्तेचा गैरवापर सुरू आहे. शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आणली हीच मोदींची गॅरंटी आहे, अशी टीकाही पवारांनी केली. मला काहींनी सांगितले की आजच्या मिटींगला ▶▶ उर्वरित पान २ वर

## गोपीनाथ मुंडेंचे वारसदार कोण ?

### पंकजा मुंडेंनी थेट घेतली या दोन नेत्यांची नावं, धनंजय मुंडेंनाही धक्का

**जालना । प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी बीडमध्ये ओबीसी नेत्यांची महाएल्गार सभा पार पडली होती, या सभेत बोलताना मंत्री छगन भुजबळ यांनी गोपीनाथ मुंडे यांचे राजकीय वारसदार म्हणून माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा उल्लेख केला होता, यावरून वातावरण चांगलंच तापलं होतं, यावर आता



राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया येण्यास सुरुवात झाली आहे. यावर प्रतिक्रिया देताना करुणा मुंडे यांनी देखील धनंजय मुंडे हेच गोपीनाथ मुंडे यांचे राजकीय वारसदार असल्याचं म्हटलं आहे. राजकारणात वारसा हा जन्मानं नाही तर विचारांचा असतो. मी धनंजय मुंडे यांचा संघर्ष जवळून पाहिला आहे. २००९ पासून मी धनंजय मुंडे यांचा संघर्ष पाहात आहे, त्यामुळे भुजबळ जे बोलले ते बरोबर बोलले, धनंजय मुंडे हेच गोपीनाथ मुंडे यांचे खरे राजकीय वारसदार असल्याचं करुणा मुंडे यांनी म्हटलं होतं. तर त्यानंतर प्रकाश महाजन यांची देखील यावर प्रतिक्रिया समोर आली. प्रकाश महाजन यांनी करुणा मुंडे आणि मंत्री छगन ▶▶ उर्वरित पान २ वर

## बिंदूसरा नदीत स्त्रीलिंगी बाळाचा मृतदेह आढळला

### खासबाग/मोमीनपुरा जोडरस्त्या लगत पाण्यात मृतदेह आढळल्याने खळबळ.

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बिंदूसरा नदी पात्रात आज दिनांक २५ ऑक्टोबर रोजी एका स्त्रीलिंगी बाळाचा मृतदेह आढळून आल्याने शहरात खळबळ उडाली आहे. बीड शहरातील खासबाग ते मोमीनपुरा जोड रस्त्यावर असलेल्या पाण्यात काहीतरी असल्याचे लक्षात आल्यानंतर नागरिकांनी जवळ जाऊन पाहिले असता तेथे बाळाचा मृतदेह असल्याचे दिसून आले. याची माहिती तात्काळ बीड शहर पोलिसांना देण्यात आली. घटनास्थळी शहर पोलीस ठाण्याचे कर्मचारी दाखल



झाले. त्यांनी मृतदेह पाण्यातून बाहेर काढून पुढील तपासासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला आहे. बाळ अंदाजे एक वर्षाचे असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. याची माहिती शहरभर पसरली असून बिंदुसरा नदी पात्रात नागरिकांनी गर्दी केली होती. बाळ दोन तीन दिवसापासून पाण्यात टाकल्याचा संशय व्यक्त होत आहे,या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, बाळ नदीत कसे आले? बाळाला पाण्यात टाकले का? याचा तपास पोलिस करत आहेत. हा घातपात देखील असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## ओबीसी मराठा वाद डोक्यातून काढा : आ.संदीप क्षीरसागर



**बीड । प्रतिनिधी**

जोपर्यंत कार्यकर्त्याच्या निवडणूका होत नाहीत तोपर्यंत शांत बसणार नाही आणि अडचणीच्या काळात सोबत राहिलेल्या कार्यकर्त्यांना आयुष्यभर विसरणार नसल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी बैठकीतून सांगितले. बीड जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि.२४ (शुक्रवार) रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरद चंद्र पवार गट) ▶▶ उर्वरित पान २ वर

● राज्यात किंवा बीड जिल्ह्यात एखादी वाईट घटना घडली की बीड पासून मोर्चे आंदोलने काढली जातात. हे मोर्चे आंदोलने काढणारे मुळात बीडचे नसतात. हे सर्व जातीवादी लोक बाहेरच्या जिल्ह्यातील असतात. त्यांच्याकडून बीडचे वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न केला जातो. निवडणुका आल्या की हिंदू मुस्लिम, ओबीसी मराठा वाद निर्माण करायचा. यातून आपली राजकीय पोळी भाजून घ्यायची असते. या बीडमध्ये आम्ही सर्व समाज गुण्यागोविंदाने राहतो. त्यामुळे परळी सारखा पॅटर्न बीडमध्ये घडत नाही. बाहेरील जिल्ह्यातील लोकांकडून बीडचे वातावरण अस्थिर केले जात आहे. त्यांच्या भूलथापांना बळी न पडता सर्व समाजाने आंदनात राहून एकत्र असल्याचे दाखवून द्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांच्या बैठकीत केले.

## मला माफ करा, माझ्या मुलांचा सांभाळ करा

### कर्जबाजारी शेतकऱ्याने गळफास घेतला



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये शेतकरी आत्महत्याची संख्या दिवसेदिवस वाढत आहे. तालु३यातील राक्षसभुवन येथील एका कर्जबाजारी शेतकऱ्याने गळफास घेवून आत्महत्या केली. आत्महत्याकरण्यापुर्वी त्यांनी एक चिठ्ठी लिहून ठेवली. चिठ्ठीमध्ये कर्ज ▶▶ उर्वरित पान २ वर

## निष्ठा, प्रामाणिकपणा व कर्तुत्ववान सेवेमुळे जे. आर. पवार उत्कृष्ट प्रशासक ठरले : माजी मंत्री बाळासाहेब थोरात

● शिस्तबद्ध, पारदर्शक कारभारातून शेतकऱ्यांना न्याय देणाऱ्या जे.आर. पवार: आ.सुरेश धस

● वृद्धेश्वर कारखान्याच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी जे आर पवार यांचे योगदान : आ मोनिका राजळे

**आष्टी । प्रतिनिधी**


आपल्या कामाप्रती निष्ठा, कार्यतत्परता, प्रामाणिकपणा आणि कर्तृत्ववान सेवा यामुळे आदरणीय जे.आर. पवार हे उत्कृष्ट प्रशासक ठरले आहेत. तसेच ते एक कुटुंब वत्सल व्यक्ती असल्यामुळे त्यांनी आपला गोतावळा जपून ठेवला असे गौरवोद्गार राज्याचे




माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी आष्टी तालुक्यातील पिंपळा येथे आयोजित कृतज्ञता सोहळ्यामध्ये काढले. अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी येथील वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या आस्थापनेतून कार्यकारी संचालक व कार्यकारी सल्लागार या पदावरून पवार ▶▶ उर्वरित पान २ वर

## डॉ.संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणाचा तपास विशेष तपास यंत्रणेद्वारे व्हावा

### न्याय मिळण्यासाठी मुंडे कुटुंबियांच्या पाठीशी : आ.सुरेश धस



**आष्टी। प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील कोठरबन येथील अल्पभूधारक शेतकरी असणाऱ्या मुंडे कुटुंबीयांनी कष्ट करून पोटाला चिमटे घेऊन मुलीला डॉक्टर केले त्या डॉक्टर संपदा मुंडे यांना आत्महत्या करावी लागली या प्रकरणातील संशयित आरोपी पोलीस उपनिरीक्षक गोपाल बदने, संपदाच्या घरमालकाचा मुलगा बनकर, तिच्यावर दबाव आणणारे तथाकथित खासदार, त्यांचा पीए, आणि ▶▶ उर्वरित पान २ वर

## एस पी साहेब, दिपावली व पाडव्याच्या गोडव्या नंतर तलवाडा पोलीस स्टेशनच्या हाद्दीत अवैध धंदे जोमाने सुरु



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशनच्या हाद्दीत सातत्याने मोठ्या प्रमाणात विविध प्रकारचे अवैध धंदे चालत आसल्याचे आणेक वेळा समोर आलेले असुन तलवाडा पोलीस स्टेशनच्या हाद्दीतील अवैध धंदे सुरु आसल्याचे वारंवार वृतपत्रात बातम्या आल्याने जिल्हा पोलीस आधिक्षकांनी आदेशाने काही प्रमाणात बंद विविध वृतपत्रातील बातम्याची दखल घेऊन अवैध धंदे बंद करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने स्थानिक पोलिस प्रशासनाने तात्पुरत्या स्वरूपात हे धंदे बंद करण्याचे आदेश अवैध धंदे चालकांना दिले होते. त्या मुळे अवैध धंदे बंद झाल्याचे चित्र दिवाळी व पाढव्या पूर्वी पहावयास मिळाले होते. परंतु दिपावलीच्या व पाढव्याच्या गोडव्या नंतर लागलीच विविध अवैध धंद्यासह मनोरंजनार्थ कल्बच्या नावाखाली अवैधरित्या मनोरंजनार्थ कल्ब पुन्हा जोमाने सुरु झाल्याचे जाणकारातुन बोलल्या जात आहे. बीड जिल्ह्याला कर्तव्य दक्ष पोलीस अधीक्षक लाभले तेव्हा बीड जिल्ह्यातील नागरिकांनी अवैध धंदे बंद होतील आस्या अपेक्षा व्यक्त केल्या होत्या. त्या अनुषंगाने तात्पुरत्या स्वरूपात अवैध धंदे बंद देखील झाले होते. परंतु एस पी साहेबांच्या आदेशाची खील्ली उडवत तलवाडा पोलीस स्टेशनच्या हाद्दीत पुन्हा जोमाने विविध अवैध धंदे व मनोरंजनार्थ कल्ब सुरु झाल्याचे बोलल्या जाऊ लागल्याने तलवाडा पोलीसात जिल्हा पोलीस आधिक्षकांच्या आदेशाची कचरा किम्मत आसल्याची या निमित्ताने चवीने चर्चा ऐकावयास मिळत आहे.



# अतिवृष्टीच्या छायेत : अल्पभूधारक शेतकरी व शेतमजुरांचा संघर्ष

महाराष्ट्र ही भूमी निसर्गाने अपार वैविध्याने समृद्ध केलेली आहे. सह्याद्रीच्या डोंगररांगा, कोकणचा समुद्रकिनारा, विदर्भाचा काळा मातीचा पट्टा आणि मराठवाड्याची शुष्क मैदाने यांमुळे या राज्याची कृषीसंस्कृती वेगळ्या छटा घेऊन समोर आली आहे. शतकानुशतके लोक शेतीवर अवलंबून राहिले, शेतकऱ्यांच्या घामाच्या थेंबांतून अन्नाची श्रीमंती निर्माण झाली, परंतु गेल्या काही दशकांत हवामानातील बदल, अनियमित पाऊस, दुष्काळ आणि आता अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तींचा जो खेळ सुरू झाला आहे, त्याने कृषिप्रधान समाजाचे मूळच हादरवून टाकले आहे. गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये झालेल्या सततच्या आणि अनियमित अतिवृष्टीमुळे हजारो हेक्टर शेतीचे नुकसान झाले, घरे उद्ध्वस्त झाली, जनावरे वाहून गेली, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे अल्पभूधारक शेतकरी व शेतमजूर वर्गाच्या जगण्यावर गंभीर परिणाम झाला. हे संकट केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक, मानसिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक स्तरावरही विनाशाची लाट निर्माण करते. भारतीय हवामान विभागाच्या अहवालानुसार, मागील दोन वर्षात महाराष्ट्रात जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला, महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये. हवामान बदलाच्या जागतिक प्रवृत्तीमुळे पावसाचे स्वरूप अधिक अस्थिर झाले असून काही दिवसांत महिनाभराचा पाऊस पडतो, तर नंतरचा काळ कोरडा जातो. या असंतुलनाचा सर्वात मोठा फटका अल्पभूधारक शेतकऱ्यांना बसतो, कारण त्यांच्याकडे साठवण, पिकवण आणि जोखमीशी सामना करण्याची क्षमता मर्यादित असते, तर शेतमजूर वर्ग तर अधिक बिकट परिस्थितीत असतो, कारण त्यांची जमिन स्वतःची नसते, त्यामुळे पिक नष्ट झाल्यावर उत्पन्न आणि काम दोन्ही संपते. महाराष्ट्रातील सुमारे ७५ टक्के शेतकरी अल्पभूधारक असण्याची शक्यता असून त्यांची संपूर्ण अर्थव्यवस्था पावसावर अवलंबून असते. पावसाचे प्रमाण किंवा वेळ बिघडल्यास त्यांचा आर्थिक पाया कोसळतो, माती वाहून जाते, पाणथळ जागा तयार होतात, बी-बियाणे, खत आणि शेतीसाठी लागणारी साधने नष्ट होतात. परिणामी पुढील हंगामासाठी आवश्यक संसाधनांची उपलब्धताही कमी होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेत अल्पभूधारक शेतकरी हा 'उत्पादनाचा कणा' आहे, तर शेतमजूर हा 'कामगाराचा आत्मा', आणि या दोघांशिवाय ग्रामीण समाजाचे चक्र टिकत नाही. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे नुकसान म्हणजे शेतमजुरांची बेरोजगारी, आणि शेतमजुरांची बेरोजगारी म्हणजे गावातील खरेदी-विक्रीचे थांबणे, परिणामी संपूर्ण ग्रामीण बाजारपेठ ठप्प होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, नैसर्गिक आपत्ती ही केवळ पर्यावरणीय घटना नसून, ती सामाजिक घटना देखील असते कारण तिचा परिणाम मानवी संबंध, सामाजिक संरचना आणि आर्थिक पद्धतींवर थेट होतो. अतिवृष्टीमुळे शेतकरी कुटुंबातील कामाचे वाटप, निर्णयप्रक्रिया, स्त्री-पुरुष भूमिकांचे संतुलन आणि सामाजिक संबंध बदलतात. महिलांवर दुहेरी ताण येतो; एकीकडे घर सांभाळायचे, मुलांचे शिक्षण, आजारपण सांभाळायचे, तर दुसरीकडे शेतातील संकटात मजुरी करून जीविकोपार्जन करायचे. अनेक ठिकाणी महिला स्वयंसेवी संस्थांमार्फत उभ्या राहून आर्थिक आधार निर्माण करत आहेत, परंतु प्रयत्न अपुरे आहेत. तसेच, अतिवृष्टीग्रस्त भागांत स्थलांतर वाढते आहे, अनेक शेतकरी आणि शेतमजूर आपली गावं सोडून शहरांकडे मजुरीसाठी निघाले आहेत. स्थलांतरामुळे ग्रामीण सामाजिक संरचना कमकुवत होते, गावांतील सामाजिक एकोपा, परंपरा आणि लोकजीवनाचे सांस्कृतिक स्वरूप ढासळत आहे.

अतिवृष्टी आणि त्यानंतरची आर्थिक हानी शेतकऱ्यांच्या मानसिक आरोग्यावरही गंभीर परिणाम करते. राज्यातील आत्महत्येचे प्रमाण वाढण्यामागे हवामानाशी संबंधित संकट एक महत्त्वाचे कारण आहे (छउठइ, २०२३). जेव्हा शेतकरी पिकावर घेतलेले कर्ज फेडू शकत नाही, तेव्हा त्याला समाजातील अपमान, आर्थिक ताण आणि नैराश्य यांचा सामना करावा लागतो. शेतमजूर वर्ग मात्र सतत 'आजचे जेवण, उद्याचे काम' या संघर्षात अडकलेला राहतो. राज्य शासनाने नुकसानभरपाई, पीकविमा योजना, आणि पुनर्वसन यांसारखे उपाय केले असले तरी अल्पभूधारक शेतकऱ्यांपर्यंत यांचा लाभ पूर्णपणे पोहोचत नाही, कारण शासकीय आकडेवारी आणि प्रत्यक्ष परिस्थिती यांत मोठी तफावत दिसते. समाजशास्त्रीय विश्लेषण सांगते की सामाजिक न्यायाचा अर्थ फक्त आर्थिक मदतीत नाही, तर शेतकऱ्यांच्या सन्मानाने जगण्याच्या अधिकारात आहे. अल्पभूधारक आणि शेतमजूर या वर्गांना 'साहाय्य घेणारे' नव्हे, तर 'निर्मिती करणारे' घटक म्हणून ओळखले पाहिजे. ग्रामीण विकासाच्या धोरणांत त्यांच्या सामाजिक अस्तित्वाचा आदर राखून निर्णय घ्यायला हवेत. गेल्या दोन-तीन वर्षांमध्ये झालेल्या अतिवृष्टीने हा पाया धूसर झाला आहे; पिकांचे संपूर्ण नुकसान, जमिनीच्या सुपीक थराचा क्षय, घरांची हानी आणि उत्पन्नात घट या घटनांनी ग्रामीण समाजावर गंभीर धक्का दिला आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे दोन ते तीन हेक्टर शेतीक्षेत्र असते आणि या क्षेत्रावर झालेल्या पावसामुळे मका, सोयाबीन, भात, कापूस, ऊस यासारख्या पिकांचे नुकसान झाले. शेतकरी पीकविमा, कर्जफेडीची योजना आणि सरकारी मदतीवर अवलंबून असतो; तथापि, योजनांचा कार्यान्वयन विलंबाने किंवा अपूर्ण पद्धतीने होत असल्यामुळे त्याला कर्जाचा फटका, साठवणुकीच्या खर्चात वाढ, आणि उत्पन्नातील घट यांचा सामना करावा लागतो. शेतमजूर वर्गाचे उत्पन्न पूर्णपणे पिकावर अवलंबून असल्याने पिके नष्ट झाल्यानंतर रोजंदारी थांबते, परिणामी घरगुती अन्नसुरक्षा धोक्यात येते. आर्थिक संकट, मानसिक ताण, कुटुंबातील मतभेद, सामाजिक प्रतिष्ठेवरील परिणाम हे सर्व एकत्रितपणे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर संक्रामक परिणाम करतात. बेरोजगारी, स्थलांतर, मुलांचे अर्धवट शिक्षण, आरोग्याची अपुरी काळजी, महिला शेतमजूरांवरील दुहेरी ताण या सर्वांनी ग्रामीण सामाजिक रचना ढासळवली आहे. पूर्वी गावोगावी संकटाच्या वेळी लोक एकत्र येत, आपले संसाधने, श्रम आणि अनुभव वाटायचे, परंतु आता प्रत्येक कुटुंब स्वतःच्या अस्तित्वासाठी इतके गुरफटले आहे की सामूहिक प्रयत्न कमी झाले आहेत; तरीही काही सकारात्मक बदल दिसतात, जसे की महिला बचत गट, युवा मंडळे, स्वयंसेवी संस्था या माध्यमातून सामाजिक एकत्रिकरण टिकवले जाते.

अतिवृष्टी ग्रामीण समाजाच्या सांस्कृतिक जीवनावरही खोलवर परिणाम करते. पावसावर आधारित सण, धार्मिक विधी, पारंपरिक गीतं, आणि समाजातील एकत्रित श्रमसंस्कृती यांचा पाया होता 'निसर्गाशी सुसंवाद', परंतु आता हा सुसंवाद ढासळला आहे. पूर्वी पावसाचा अर्थ शेतकऱ्यांसाठी कृपा होता, आता त्याला शत्रू मानले जाते. महिलांवर घरगुती तसेच शेतकामाचे ताण वाढल्यामुळे सामाजिक भूमिकांमध्ये बदल झाले आहेत. अतिवृष्टीग्रस्त भागात राजकीय क्रियाशीलता वाढते, मदतीचे वितरण समानतेवर होत नाही, राजकीय दबाव, पक्षीय हस्तक्षेप आणि भ्रष्टाचार यामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांना योजना लाभत नाहीत.

– डॉ. राजेंद्र बगाटे

◆ पान 9 वरून पुढे...

## पुन्हा अशी...

येऊ नये म्हणून काहींनी आम्हाला दमदाटी केली. टीका केली म्हणूनही पक्ष करुन दमदाटी केली. लोकशाहीमध्ये जाहीर बोलायचं नाही का? इथल्या आमदारांना मला सांगायचे आहे, तुम्ही आमदार पुणामुळे झाला, तुमच्या सभेला कोण आलं होतं, त्यावेळी पक्षाचे अध्यक्ष कोण होते, त्यावेळी पक्षाच्या फॉर्मवर सही माझी होती. तुमच्या आमदाराकीवेळी याच कार्यकर्त्यांनी काम केलं, तुम्हाला निवडून आणण्यासाठी राबले, घाम गाळला आज त्याच कार्यकर्त्यांना तुम्ही दमदाटी करता. माझी त्यांना विनंती आहे, एकदा त्यांनी दमदाटी केली... बास्स! पुन्हा असं काही केलं तर मला शरद पवार म्हणतात! मी या रस्त्याने कधी जात नाही. पण या रस्त्याने जाण्याची स्थिती पुणी निर्माण केली तर सोडत नाही, असा इशारा शरद पवार यांनी आमदार सुनिल शेळके यांना दिला.

## गोपीनाथ मुंडेंचे...

भुजबळ यांचा दावा खोडून काढत पंकजा मुंडे याच गोपीनाथ मुंडे यांच्या खऱ्या वारसदार असल्याचं म्हटलं होतं. दरम्यान त्यानंतर टीपी मुंडे यांनी मात्र आपणच मुंडे यांचे खरे राजकीय वारसदार असल्याचा दावा केला तर सारंगी महाजन यांनी मात्र पंकजा मुंडे आणि धनंजय मुंडे हे दोघेही गोपीनाथ मुंडे यांचे राजकीय वारसदार नसल्याचं म्हटलं आहे. दरम्यान आज यावर पंकजा मुंडे यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे, जालन्यात बंजारा समाजाला एसटी वर्गातून आरक्षण मिळावं यासाठी विजय चव्हान यांचं उपोषण सुरू आहे, त्यांची भेट घेण्यासाठी जे सरकारचं शिष्टमंडळ आलं होतं, त्यामध्ये पंकजा मुंडे यांचा देखील समावेश होता. यावेळी त्यांना भुजबळांच्या वक्तव्यासंदर्भात विचारलं असता, त्यांनी थेट मुंडे साहेबांचे वारसदार हे संजय राठोड आणि अर्जुन खोतकर असल्याचं म्हटलं आहे. दरम्यान पंकजा मुंडे यांच्या या विधानानंतर आता राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे.

## ओबीसी मराठा...

च्या वतीने आ. संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड आणि शिरूर कासार तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांची आणि पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आ. संदीप क्षीरसागर यांनी बोलावलेल्या या बैठकीला पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. याबैठकीला कार्यकर्ते, पदाधिकारी आणि इच्छुक उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी उपस्थितांना जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकी संदर्भातील संघटनात्मक तयारी, उमेदवार निवड प्रक्रिया, प्रचार आराखडा आणि पक्ष बळकटीकरण यावर मार्गदर्शन केले. यावेळी आ.संदीप क्षीरसागर म्हणाले की, माझ्या आमदारकीच्या निवडणुकीत अडचणीच्या काळात सोबत राहिलेल्या कार्यकर्त्यांना आयुष्यभर विसरणार नाही. विधानसभेच्या वेळी

◆ पान 9 वरून पुढे...

कार्यकर्त्यांनी माझ्यासाठी काम केलं आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्यांच्यासाठी काम करणार आहे. जोपर्यंत कार्यकर्त्यांच्या निवडणुका होणार नाहीत तोपर्यंत मी आराम करणार नाही. आताच्या घडीला तरी आपल्या समोर कोणीच दिसत नाही. कारण आपण रस्त्यावर उतरून काम करणारे कार्यकर्ते आहोत.त्यामुळे जनतेचा आपल्याला पाठिंबा आणि आशीर्वाद मिळतोय. आपल्या पक्षाची भूमिका ही स्पष्ट आणि ठोस आहे. जवळची माणसं सोबत असल्याने ठोस आणि ठामपणे भूमिका घेतो. येणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये सर्व कार्यकर्त्यांनी ओबीसी मराठा वाद डोक्यातून काढला पाहिजे. सर्वसामान्य लोकांसाठी रस्त्यावर उतरून काम करा. राज्य सरकारच्या पॅकेज ने शेतकरी बांधव संतुष्ट नाही. सरकारला देखील ग्रामीण भागात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये पराभव दिसत असल्याने नगरपालिकेची निवडणूक ही जिल्हा परिषद आणि पंचायत समिती च्या अगोदर घेत आहेत. कार्यकर्त्यांना आवाहन करताना आ.संदीप क्षीरसागर म्हणाले की, कार्यकर्त्यांनो गुत्तेदारीसाठी निवडणुका लढू नका. अगोदरच स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये प्रशासक असल्याने नागरिकांचे कामे रखडली आहेत. लोकांच्या कामासाठी रस्त्यावर उतरून प्रश्न मार्गी लावा. ही जनता काम करणाऱ्याच्या कायम पाठीशी उभी राहते. येणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत माझ्या अडचणीच्या काळात सोबत राहिलेल्या कार्यकर्त्यांना संधी देणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत विजय खेचून आणायचा आणण्यासाठी चेन पद्धतीने चालायाचे आहे. चेन पद्धतीने आपण मोठ्या फरकाने विजय मिळवू असा विश्वास देखील दिला. कार्यकर्त्यांनी देखील आ.संदीप भैय्यांच्या नेतृत्वाखाली पूर्ण ताकदीने निवडणूक लढवून जिल्हा परिषद व पंचायत समिती ताब्यात आणण्याचा संकल्प केला आहे. यावेळी माजी आ.सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, राज्याचे प्रवक्ते शिवराज बांगर, वैजनाथ तांदळे यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मला माफ...

असल्याचा उल्लेख आहे. त्याच बरोबर माझ्या मुलांना सांभाळा असे ही चिठ्ठीमध्ये मयत शेतकऱ्यांनी उल्लेख केलेला आहे. महादेव तुकाराम राऊत (वय ४२ रा.राक्षसभुवन) या शेतकऱ्याने लिंबाच्या झाडाला गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना आज दुपारी घडली. आत्महत्या करण्यापुर्वी शेतकऱ्यांने चिठ्ठी लिहून ठेवली आहे. या चिठ्ठीमध्ये आपल्याकडे कर्ज असल्याचा उल्लेख आहे.गंगासागर तु मला माफ कर...संसार उघड्यावर टाकून मी चाललो आहे. माझ्या मुलांचा सांभाळ कर.... अशा पध्दतीचा उल्लेख या चिठ्ठीमध्ये आढळून आला आहे. या शेतकऱ्यांला दोन मुली, एक मुलगा, पत्नी असा परिवार आहे. सदरील शेतकऱ्याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रूग्णालयात आणण्यात आला आहे.

◆ पान 9 वरून पुढे...

## निष्ठा, प्रामाणिकपणा...

साहेब नुकतेच निवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांच्या जन्मगावी पिंपळा येथे शुक्रवार दि २४ ऑक्टोबर २०२५ कृतज्ञता सोहळा आयोजित करण्यात आला होता. पुढे बोलताना मा.थोरात म्हणाले की पाथर्डी सारख्या दुष्काळी भागातील, तीन वर्षे बंद पडलेला वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना त्यांनी आपल्या कार्य कुशलतेने यशस्वीपणे आज तागायत चालवून दाखवला. वृद्धेश्वरचे सर्वेसर्वा राजळे कुटुंबाला पवार साहेब हे आपल्या कुटुंबापैकीच एक वाटतात. आणि त्यांच्या जन्मगाव पिंपळा परिसरातील लोकांनाही ते आपलेच वाटतात. सर्वच क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये नोकरदार वयाच्या ५८ ते ६० वर्षापर्यंतच निवृत्त होतात. परंतु उत्कृष्ट प्रशासक या संज्ञेस पात्र असणारे पवार साहेब मात्र वयाच्या ७१ व्या वर्षी वृद्धेश्वरच्या आस्थापनेतून निवृत्त होत आहेत असेही ते म्हणाले. यावेळी बोलताना आ.धस म्हणाले, आपणच त्यांच्या कार्याची कृतज्ञता व्यक्त करायला पाहिजे. कारण त्यांच्या अनेक आठवणी या फक्त आठवणी नाहीत तर त्या या भागाच्या इतिहासाचा एक अविभाज्य भाग आहेत.पवार साहेब जेव्हा कडा साखर कारखान्यावर कार्यरत होते, त्या काळात कारखान्याचा लौकिक दूरवर पोहोचला होता. शिस्तबद्ध, पारदर्शक आणि शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देणारा कारभार त्यांच्या काळात झाला. कोणत्याही शेतकऱ्याचा, वाहतूकदाराचा किंवा ऊस तोडणी मजुराचा एकही पैसा त्यांनी थांबवला नाही. नंतर काही सभासदांच्या वादामुळे त्यांना कारखाना सोडत त्यांनी वेगळा मार्ग निवडला. जर ते कार्य अखंड सुरू राहिले असते, तर हा तालुका आणखी प्रगतीच्या मार्गावर गेला असता. आज या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्या सुवर्णकाळाच्या आठवणींना उजाळा देत, आमदार सुरेश धस यांनीही पवार साहेबांना पुढील कार्याचा व निरोगी आयुष्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा आदर्श पुढील पिढ्यांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल शिस्तबद्ध आणि पारदर्शक कारभारातून शेतकऱ्यांना न्याय देणाऱ्या जे.आर. पवार साहेबांच्या कार्याची आमदार धस यांनी केली उजळणी दिली. यावेळी बोलताना आमदार मोनिकाताई राजळे यांनी त्यांच्या प्रदीर्घ सेवेचे कौतुक करून, त्यांच्या कामाची प्रशंसा केली. कारखान्याच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी त्यांनी दिलेले योगदान अनुकरणीय आहे असेही त्या म्हणाल्या. त्यांच्या समर्पित कार्यामुळे संस्था नेहमीच पुढे वाटचाल करीत राहील आणि श्री जे .आर. पवार साहेब यांच्या पुढील आयुष्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. शुक्रवार दि २४ ऑक्टोबर २०२५ रोजी वृद्धेश्वर साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक व आस्थापनेचे कार्यकारी सल्लागार जे. आर .पवार यांचा सेवा निवृत्ती सोहळा तसेच शंकरराव रामचंद्र पवार या त्यांच्या थोरल्या बंधूचा शताब्दी महोत्सव सोहळा आणि श्रीमती ताराबाई हरिभाऊ पवार या त्यांच्या वहिनीचा अमृत महोत्सव सोहळा अशा तीन कार्यक्रमाचे आयोजन यावेळी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार साहेबराव दरेकर हे होते. यावेळी बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आष्टी तालुक्यातील बंद अवस्थेतील

◆ पान 9 वरून पुढे...

कडा सहकारी साखर कारखाना यशस्वीपणे चालू करण्यासाठी सल्लागार म्हणून जे. आर .पवार यांनी सेवा द्यावी असा आग्रह बोलून दाखविला. राजकारणाचे जोडे बाहेर ठेवून सहकार्य करण्याचा मनोदय यावेळी जे. आर. पवार साहेब यांनी व्यक्त केला. यावेळी पद्मश्री पोपटराव पवार ,आमदार सुरेश धस, माजी आमदार भीमराव धोंडे ,माजी आमदार बाळासाहेब आजबे ,माजी कुलगुरू सर्जेराव निमसे, युवा नेते सागर धस ,श्रीमती सुशीला ताई मोराळे यांची समायोचित भाषणे झाली. यावेळी वृद्धेश्वर साखर कारखान्याचे चेअरमन व सर्व संचालक मंडळ तसेच दादा पाटील राजळे महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक वर्ग मराठा सेवा संघाचे तालुका अध्यक्ष इंजि.तानाजी बापू जंजिरे व सर्व कार्यकारिणी सदस्य, ज्येष्ठ पत्रकार ड सीताराम पोकळे, पत्रकार अविनाश कदम, पत्रकार प्रविण पोकळे, पत्रकार सचिन रानडे, पत्रकार संतोष सानप, पत्रकार शरद तळेकर,पत्रकार समीर शेख,अक्षय विधाते,सोपान पगारे,युवा नेते प्रदीप थोरवे, सरपंच सावता ससाने, सरपंच संजय विधाते ,ह भ प राऊत महाराज ,ह भ प कराळे माऊली महाराज ,आरपीआयचे अध्यक्ष अशोक साळवे ,किसान सभेचे बबन आवटे ,डॉ. मधुकर हंबर्डे ,चीफ इंजिनिअर संदीपपान जाधव ,निवृत्त कार्यकारी संचालक हरिभाऊ मार्कंडे, सुखलाल मुथा, पं. स. माजी सदस्य संजय धायगुडे , कॅप्टन सहस्रबुद्धे,माजी सरपंच चंद्रकांत साके,पप्पू गवळी, मल्हार सेनेचे युवराज खटके ,समाजसेवक प्रा. दादा विधाते, आम आदमी पार्टीचे तालुकाध्यक्ष सुहास चौधरी आणि बीड व अहिल्यानगर जिल्ह्यातील पवार साहेबावर प्रेम करणारे मान्यवर ,नातेवाईक व मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य टेमकर सर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालक श्रीमती विना दिघे यांनी केले .शेवटी सर्व उपस्थितांचे आभार युवा नेते प्रदीप थोरवे यांनी मानले.

## डॉ.संपदा मुंडे ...

तक्रारीची दखल न घेणारे उपजिल्हा रुग्णालयाचे अधिकारी या सर्वांची कसून चौकशी करण्यात यावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली आहे याबाबत प्रसार माध्यमांशी बोलताना.. ते पुढे म्हणाले, बीड जिल्ह्यातील जनता गोरगरीब असले तरी कष्टकरी परंतु स्वाभिमानी आहे राज्यात शैक्षणिक क्षेत्रात बीड जिल्ह्यातील मुला-मुलींनी नाव कमावले आहे मात्र डॉ.संपदा मुंडे हिला बीडची आहे असे म्हणून हिणवण्यात आले आहे ही अत्यंत चुकीची बाब आहे डॉ. संपदा हिला आत्महत्यामे सारखे टोकाचे पाऊल उचलावे लागले यामागे काहीतरी गंभीर कारण असावे आमच्या भागातील गोरगरीब लेकींचा कोणी गैरफायदा घेत असेल त्यांना जरब बसण्याची आवश्यकता आहे.. यापुढे दुसरी संपदा होऊ नये यासाठी या आत्महत्या प्रकरणाचा तपास विशेष तपास यंत्रणेद्वारा करण्यात यावा आणि हा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवण्यात यावा जेणेकरून आरोपींना तात्काळ शिक्षा मिळेल मयत डॉ. संपदा मुंडे यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी मी भक्कमपणे उभा राहणार आहे असेही आ.धस यांनी शेवटी सांगितले

◆ पान ४ वरून पुढे...

## शेतकऱ्यांसाठी केलेल्या...

बीड जिल्ह्यात सोयाबीन क्षेत्र ५०% पेक्षा अधिक आहे. त्यातही बीड तालुक्यातील बालाघाट व मैदानी परिसरातील बहुतांश क्षेत्र सोयाबीन लागवडीखालील आहे. सध्या सोयाबीन खाजगी भाव ३१०० ते ४१०० दरम्यान आहे. मात्र हमीभाव हा ५३२८ रुपये प्रति क्विंटल असून दोन्हीत फरक जवळपास १४०० ते १५०० रुपयांचा दिसून येतो आहे. म्हणून ज्या शेतकऱ्यांनी अद्याप देखील सोयाबीन विक्री केलेली नसेल त्या शेतकऱ्यांनी आपली सोयाबीन हमीभावाने विक्री करावी असे आवाहन संचालक धनंजय गुंदेकर यांनी केले आहे..

## एकत्र काढून...

रुपयांचे नुकसान झाले आहे. याबाबत माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशनला सदरील शेतकरी व बीड न्यायालयात वकील म्हणून कार्यरत असणारे अँड. सुरेश सोपानराव साळवे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादीत असे म्हटले आहे की, माजलगाव तालुक्यातील फुले पिंपळगाव शिवारात गट नं.२६० मध्ये एकुण दिड एकर जमिन आहे.याठिकाणी सोयाबिन पिकांच्या ३ बॅगची पेरणी केली होती. यापैकी दोन बॅगच्या पिकाची कापणी करुन याच शेतात सोयाबीन झाकून ठेवली होती. दिनांक २३ ऑक्टोबरच्या मध्यरात्री अज्ञात व्यक्तीने एकत्र करून व नीटनेटकी झाकून ठेवलेली संपूर्ण सोयाबीन जाळून टाकली.

## सह्याद्री ऑर्थो...

आशीर्वाद लाभले. डॉ. प्रमोद शिंदे यांनी मागील आपल्या वैद्यकीय सेवेचा लेखाजोखा मांडला तसेच रुग्णालयातील अत्याधुनिक मशीनची माहिती दिली. मान्यवरांनी बोलताना डॉक्टर प्रमोद शिंदे यांच्या प्रामाणिक वैद्यकीय सेवेचे तसेच त्यांच्या संघटन कौशल्याचे कौतुक केले. आमदार विजयराजे पंडित यांनी शिवछत्र परिवार आणि शिंदे कुटुंबीयाचे मागील तीन पिढ्यापासून संबंध असल्याचे सांगून डॉ. प्रमोद शिंदे यांच्या सामाजिक कार्याचा आवर्जून उल्लेख केला व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. डॉ विजय काकतकर यांनी याप्रसंगी बोलताना डॉ. प्रमोद व डॉ. सौ सुषमा यांना शुभेच्छा दिल्या व डॉ प्रमोद यांच्या विशेष गुणांचे कौतुक केले. आपल्या विद्यार्थ्यांची प्रगती पाहताना आनंद होत असल्याचे नमूद केले.मा.आ.राजेंद्र जगताप,डॉ.योगेश क्षीरसागर,डॉ.संजय राऊत ,शेख निझाम, शफीक भाऊ, डॉ अशोक थोरात , डॉ अशोक कोल्हे, डॉ टी एल देशमुख, डॉ एस वाय. जाधव,सागर सुरेश धस ,सौरव बजरंग सोनवणे,बाबूशेठ लोढा,अशोक शेठ

◆ पान ४ वरून पुढे...

लोढा, डॉ राजेंद्र बंड ,सर्व प्रमुख राजकीय पक्षाचे पदाधिकारी , स्नेहिजन रुग्णपरीवार,संपादक,पत्रकार बांधव आणि नागरिकांनी कार्यक्रमास उपस्थित राहून शिंदे दांपत्यास पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.सूत्रसंचालन ज्ञानदेव काशिद यांनी तर आभार प्रदर्शन सी ए बीबी जाधव साहेब यांनी केले .रात्री उशिरापर्यंत अनेक हितचिंतकांनी शुभेच्छा दिल्या.

## तेलगाव जिल्हा...

ही सांगितले. यासाठी समाजासह तेलगाव गटातील मतदारांच्या दारादारात जाऊन मतांची चाचपणी करण्याच्या सूचना चांदणे यांनी कार्यकर्त्यांना दिल्या आहेत. या बैठकीस तेलगाव जिल्हा परिषद गटातील डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया चा बहुसंख्य कार्यकर्ता वर्ग उपस्थित होता.

## सोमवारी ह.भ.प. ...

मातकर (शिक्षक, शिवाजी विद्यालय, बीड) यांची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होणार आहे. त्र्यंबक महाराज मातकर हे विद्वान वक्ते, अभ्यासू कीर्तनकार आणि संत साहित्याचे गाढे अभ्यासक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या प्रवचनात संत ज्ञानेश्वर महाराजांच्या तत्त्वज्ञानाचा आणि अध्यात्मिकतेचा सखोल वेध घेतला जातो. त्यामुळे या प्रवचन सेवेची भाविकांमध्ये उत्सुकता आहे. संपूर्ण चातुर्मास कालावधीत भाविकांसाठी श्रवण, भजन, नामस्मरण, प्रवचन व कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून आध्यात्मिकतेचा प्रसार आणि समाजात सकारात्मकतेचा संदेश देण्याचा हेतू आयोजकांचा आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंटवरून होणार आहे, ज्यामुळे बीडसह राज्यभरातील ज्ञानेश्वरी प्रेमी या भक्तिसोहळ्याचा लाभ ऑनलाइन घेऊ शकतील. भाविकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून अथवा ऑनलाइन माध्यमातून या प्रवचन सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन ह.भ.प. माधव महाराज डाके (काठवडेकर) यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. तमसो मा ज्योतिर्गमय - अंधारातून प्रकाशाकडे नेणाऱ्या या चातुर्मास प्रवचनमालेतून आध्यात्मिकतेचा दीप प्रज्वलित होतोय...!

## बीड जिल्ह्यात....

वाढण्याची शक्यता असल्याने वाहतुकीदरम्यान खबरदारी घ्यावी आणि शाळा , अंगणवाड्या व आपत्कालीन यंत्रणा सतर्क ठेवाव्यात असे उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी आवाहन केले आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी गावस्तरावर आपत्कालीन पथके २४ ÷ ७ सज्ज असल्याचे म्हटले आहे . जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशांत वाघमारे यांनी धोकादायक इमारती , पुरग्रस्त किंवा

◆ पान ४ वरून पुढे...

भूस्खलन प्रवण भागात जाणे टाळण्याचे आणि कोणत्याही आपत्तीत जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे . दरम्यान पावसामुळे पिकांवर रोग - किडीचा प्रादुर्भाव वाढू शकतो . म्हणून पिकांची नियमित पाहणी करणे , कापूस व सोयाबीनचे वाळवण त्वरीत करणे , ज्वारी व हरभऱ्यात पाणी साचू न देणे , जनावरांना भिजका चारा न देणे आणि त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे आवश्यक आहे . प्रशासनाने सतत हवामान अपडेट्सवर लक्ष ठेवण्याचे आणि सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे नागरिकांना आवाहन केले असून निसर्गासमवेत शहाणपणाने वागून सुरक्षित राहा असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे .

## विक्री केलेल्या...

तसेच सदर खरेदीखत झाल्या नंतर ऊसतोड मुकादम रामचंद्र घोळवे यांनी सर्व संबंधित कार्यालयात खरेदीखता आधारे खरेदीदारांच्या म्हणजे त्यांच्या सुनांच्या नावाची नोंद करणेसाठी अर्ज दिले होते. त्यानुसार त्यांची नावे पी.आर. कार्डला, पीटीआरला नावाचा अंमल झालेला आहे. त्यामुळे अशोक उत्तम ढाकणे यांचे नाव कमी करून खरेदीदारांची नावे लावली आहेत. तसेच खरेदी दिनांकापासून आजपर्यंत रामचंद्र घोळवे व त्यांच्या सुनांनी सदर खरेदी मिळकतीसाठी रू.१६,००,०००/- पेक्षा जास्त नगर पालीकेच्या थकबाकी कराचा भरणा केलेला आहे. वादग्रस्त मिळकत ही रामचंद्र घोळवे व त्यांच्या सुनांच्या मालकी व ताब्यात असून सदर मिळकत बळकावण्यासाठी अशोक उत्तम ढाकणे यांनी घोळवे कुटुंबीयांना त्रास देणे सुरू केले आहे. परंतू अशोक ढाकणे यांचा कोणत्याही प्रकारचा सदर मिळकती बाबत सन २०१७ पासून कोणताही हितसंबंध नसताना त्यांनी रामचंद्र घोळवे व त्यांच्या सुनांच्या विरूध्द मा. दिवाणी न्यायालय व स्तर बीड यांचे न्यायालयात विशेष दिवाणी दावा क्र.१४१/२०२५ दाखल केला आहे. सदर दाव्या मध्ये सन २०१७ मध्ये करून दिलेले खरेदीखत रद्द करण्याची विनंती केली आहे. सदर दाव्या सोबत अशोक उत्तम ढाकणे यांनी मनाई हुकूम मिळणेसाठी अर्ज दाखल केला होता. परंतु कोणत्याही प्रकारचा अनुतोष मा. न्यायालयाने त्यांना दिलेला नाही.

दि.२०.०९.२०२५ रोजी सकाळी अंदाजे १०.३० ते ११.०च्या सुमारास रामचंद्र घोळवे व महिला कामगार संगीता रामदास मुंडे यांचे सोबत खरेदी केलेल्या घराची साफ-सफाई करण्यासाठी गेले असता त्याठिकाणी अशोक उत्तम ढाकणे व त्यांचा भाचा धनंजय अंकुश नागरगोजे हे आले व त्यांनी रामचंद्र घोळवे यांच्या सुनाच्या नावावरील खरेदीखत परत करून देण्याच्या कारणावरून व रामचंद्र घोळवे व त्यांचे सोबत आलेल्या संगीता रामदास मुंडे यांचेवर दगडफेक करून त्यांना जखमी केले. तसेच धनंजय नागरगोजे यांनी लोखंडी पाईपने रामचंद्र घोळवे यांना मारहाण केली. सदर

◆ पान ४ वरून पुढे...

घटनेमध्ये रामचंद्र यांच्या छातीच्या तीन फासळ्या फॅक्चर झालेल्या आहेत. त्यामुळे दि.२०/०९/२०२५ ते १०/१०/ २०२५ दरम्यान अर्जदार शिवाजीराव हार्ट केअर मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटल, बीड येथे उपचारार्थ शरीक होते. सदर घटनेमध्ये रामचंद्र घोळवे हे जखमी झाल्याचे लक्षात आल्या नंतर अशोक उत्तम ढाकणे हा त्यांच्या कुटूंबियांना घेवून बीड येथील शासकीय विश्रामगृहामध्ये बीड जिल्हयाचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे भेटण्यासाठी गेले व पत्रकार श्री नारायण नागरे यांच्या मदतीने पालक मंत्र्यांना खोटे निवेदन देवून पोलीस यंत्रणेवर राजकीय दबाव आणून रामचंद्र घोळवे व त्यांच्या कुटुंबियांवर, महिला सदस्यांवर विनयभंगा सारखा खोटा गुन्हा दाखल करण्यास भाग पाडले. त्यानंतरही अशोक उत्तम ढाकणे व त्यांचे नातेवाईक तसेच व पत्रकार नारायण नागरे यांच्या मार्फत पोलीस यंत्रणेवर राजकीय दबाव आणून रामचंद्र घोळवे व त्यांचे नातेवाईकांचे विरूध्द यापुढेही बनावट व खोटे गुन्हे दाखल करण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही श्री. घोळवे यांनी निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे अशोक उत्तम ढाकणे व त्यांचे नातेवाईक हे रामचंद्र घोळवे व त्यांच्या सुनांनी करून घेतलेले खरेदीखत परत अशोक ढाकणे यांना परत करून द्यावे म्हणून काही गुंडाना हाताशी धरून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे घोळवे कुटुंबीय भयभीत झाले असून त्यांचे बीड मध्ये राहणे मुश्कील झाले आहे. अशोक उत्तम ढाकणे व त्याचे नातेवाईकांच्या वर्तनामुळे घोळवे कुटूंबियांची बदनामी होत आहे. तसेच पत्रकार नारायण नागरे हे बीड मधील दैनिकामध्ये रामचंद्र घोळवे अर्जदार व त्याचे कुटूंबियांचे विरूध्द खोटया बातम्या छापून आणत आहे. त्यामुळे घोळवे कुटूंबियांची मानहानी झालेली आहे. घोळवे कुटूंबीय बीड शहरातील प्रतिष्ठीत म्हणून ओळखले जातात. तरी श्री अशोक उत्तम ढाकणे, त्याचे कुटूंबियांनी व पत्रकार नारायण नागरे यांनी भविष्यात अर्जदार व त्याचे कुटूंबिया विरूध्द जर कोणतीही तकार दाखल करण्याचा प्रयत्न केला तर सदर तक्रारीची चौकशी केल्याशिवाय रामचंद्र घोळवे व त्यांचे नातेवाईका विरूध्द कोणतीही कार्यवाही करण्यात येवू नये जेणेकरून घोळवे कुटुंबीयांवर अन्याय होणार नाही. तरी वरील सर्व बाबींचा विचार करता, अशोक उत्तम ढाकणे व त्यांचे नातेवाईक धनंजय नागरगोजे व पत्रकार नारायण नागरे यांचे विरूध्द प्रतिबंधात्मक व कायदेशीर कारवाई करून त्यांचेपासून घोळवे व कुटूंबिय व त्यांनी खरेदी केलेल्या मिळकतीस अशोक ढाकणे, त्यांचे नातेवाईक व पत्रकार नारायण नागरे यांनी कोणत्याही प्रकारे त्रास देवू नये म्हणून त्यांचे विरूध्द योग्य ती कार्यवाही करावी. तसेच मला व माझ्या कुटुंबीयांस संरक्षण द्यावे. भविष्यात जर काही घटना घडली तर त्यास पत्रकार नारायण नागरे, अशोक ढाकणे व त्यांचे नातेवाईक जबाबदार राहतील असेही रामचंद्र घोळवे यांनी नमुद केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# डॉ. संपदा मुंडे आत्महत्या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाईची मागणी : चौसाळा बसस्थानक येथे निदर्शने

**बीड । प्रतिनिधी**

सातारा जिल्ह्यातील फलटण उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या बीड जिल्ह्याच्या भुमिकन्या डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी दोषींवर कठोर कारवाईची मागणी करत सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या मार्गदर्शनात शिवशक्ती भीमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२५ शनिवार रोजी चौसाळा बसस्थानक येथे सर्वपक्षीय आणि सामाजिक संघटनांच्या वतीने निदर्शने करण्यात आली. एसआयटी मार्फत सखोल चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी करण्यात आली.

डॉ. संपदा मुंडे (रा. कोठारबन, ह.मु. कवडगाव, ता. वडवणी, जि. बीड) यांनी फलटण येथे कार्यरत असताना पोलिस उपनिरीक्षक गोपाल बदने आणि घरमालकाचा मुलगा प्रशांत बनकर यांच्या शारीरिक व मानसिक



छळामुळे आत्महत्या केल्याचा गंभीर आरोप आहे. आत्महत्येपूर्वी त्यांनी आपल्या तळहातावर आत्म हत्येचे कारण लिहिले होते, तसेच घरच्यांना शवविच्छेदन अहवाल बदलण्यासाठी दबाव आणला जातो असे सांगितले होते. त्यांनी यासंदर्भात उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दिली होती, मात्र वेळेत कारवाई न झाल्याने ही दुर्दैवी घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. मुंडे कुटुंबियांनीही बीड जिल्ह्याची मुलगी असल्यामुळे तिच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करण्यात आले असा गंभीर आरोप केला आहे.

आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी अशी आहे की - या प्रकरणाची एसआयटीमार्फत सखोल चौकशी करण्यात यावी. आत्महत्येस जबाबदार असलेल्या पोलिस अधिकाऱ्यांवर व अन्य दोषींवर कठोर कारवाई करावी. तसेच शवविच्छेदन अहवालात हस्तक्षेप करणाऱ्यांवरही गुन्हे दाखल करण्यात यावेत.

रिपाई जिल्हा उपाध्यक्ष बापुराव पवार,माजी सभापती काकासाहेब जोगदंड, श्रीमंत सोनावणे पांडुरंग, शिवसंग्राम नेते पांडुरंग आवारे, कल्याण महाराज जगताप, प्रदेशाध्यक्ष छत्रपती राजेशाहु महाराज विचारमंच विवेक कुचेकर,प्रा.आबासाहेब जाधव,बळीराम राऊत,मुस्तफा पठाण,आजिनाथ सोनावणे, सोहेल पठाण, प्रमोद नाईकवाडे, संतोष बोरखेडे, आत्माराम नाईकवाडे, उत्तम जाधव, लिंबाजी तांदळे , पत्रकार एन टी.वाघमारे, विकास नाईकवाडे , चौसाळा पोलिस ठाण्याचे सचिन मुरूम कर,सचिन गर्जे उपस्थित होते. आदी आंदोलनात सहभागी होऊन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## महापुरुषांचे आशीर्वाद घेऊन बाबा कांबळे यांचा एल्गार तेलगाव जि.प.गटातून निवडणूक लढवण्याची मागणी

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र देव दहिफळे येथे मातंग समाजाची भव्य निर्धार बैठक पार पडली. यामध्ये तेलगाव जिल्हा परिषद गटातून युवा नेते बाबा कांबळे यांनी निवडणूक लढवावी अशी मागणी सर्वानुमते करण्यात आली. शेतकरी, कष्टकरी, ऊसतोड कामगार व डोंगरपट्ट्यातील सामान्य लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण ही निवडणूक लढवू आणि जिंकू सुद्धा असा एल्गार बाबा कांबळे यांनी महापुरुषांचे आशीर्वाद घेऊन केला. यावेळी सर्कलमधील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सामाजिक चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून बाबा कांबळे जिल्हाभरात सुप्रसिद्ध आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, लहुजी वस्ताद साळवे, महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे आदी महापुरुषांचे विचार केवळ बोलण्या पुरतेच नाही तर ते आचरणात आणून सामाजिक सलोखा व बंधुभाव कायम राहिला पाहिजे यासाठी कांबळे प्रयत्नशील असतात. नुकतीच धारूर तालुक्यातील देवदहिफळ येथे मातंग समाजाची व्यापक निर्धार बैठक पार पडली. यामध्ये सर्वांनी बाबा कांबळे यांनी तेलगाव जि.प. गटातून निवडणूक लढवावी अशी जोरदार मागणी केली. बाबा कांबळे यांचे संघटन व समाजातील उपेक्षित घटकांसाठी काम करण्याची तळमळ सर्वश्रुत आहे. सर्व जाती धर्माच्या लोकांना सोबत घेऊन काम करणारा कांबळे हा अजातशत्रू कार्यकर्ता आहे. तेलगाव जिल्हा परिषद गट हा अनुसूचित जातीच्या महिलासाठी आरक्षित असल्यामुळे कांबळे यांच्या सुविद्य पत्नी सौ. पूजा कांबळे यांची उमेदवारी प्रबळ समजली जाते. त्यांची उमेदवारी विजयाच्या दृष्टिकोनातून परिणाम कारक राहील अशी चर्चा मतदार संघात आहे. त्यांची उमेदवारी सर्व दृष्टिकोनातून सक्षम असल्यामुळे त्यांनी निवडणूक लढवावी अशी मागणी सदरील बैठकीत करण्यात आली.

## डॉ. संपदा मुंडे या तरुणीच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्या दोषींवर कठोर कारवाई करावी - ॲड. सुभाष राऊत

**नराधमांना फाशी द्या ! - अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

**माजलगाव । प्रतिनिधी**

साताऱ्यातील फलटण शहरातील उपजिल्हा रुग्णालयात कार्यरत असलेल्या महिला डॉक्टर संपदा मुंडे यांनी शहरातील एका हॉटेलमध्ये आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. मृत डॉक्टरने आत्महत्येपूर्वी तिच्या तळहातावर सुसाइड नोट लिहिली असून, त्यात तिने दोन पोलिस अधिकाऱ्यांवर मानसिक छळाचे गंभीर आरोप केले आहेत. डॉक्टर महिलेने सुसाइड नोटमध्ये म्हटलं आहे की, पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने यांनी तिच्यावर वारंवार अत्याचार केला होता. तसेच पोलीस अधिकारी प्रशांत बनकर यांनी तिचा सलग चार



महिने मानसिक छळ केला होता. महिलेच्या हातावरील सुसाइड नोटची आता फॉरेन्सिक तपासणी केली जाणार आहे. दुसऱ्या बाजूला या घटनेने नागरिकांमध्ये संतापाचं वातावरण असून दोषींवर कठोर कारवाई व्हावी अशी मागणी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी केली आहे.

फलटणमधील या घटनेने महाराष्ट्र हादरला असून नागरिकांच्या संरक्षणाची जबाबदारी असलेले पोलीसच मानसीक छळ करत असतील तर जनतेने कोणाकडे पाहायचं? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. डॉक्टर महिलेने सुसाइड नोटमध्ये स्पष्ट लिहिलं आहे की, माझ्या मरण्याचे कारण पोलीस निरीक्षक गोपाळ बदने आणि प्रशांत बनकर ज्याने मागील पाच महिन्यांपासून माझा शारीरिक व मानसिक छळ केला. कायद्याचे रक्षक असलेले पोलीसच जर भक्षक बनत असतील तर यापेक्षा काय वाईट आहे? या डॉक्टर महिलेने पीएसआय बदनेने चार वेळा अत्याचार केला. पोलिस प्रशांत बनकर याने मानसिक त्रास दिला असं सुसाइड नोटमध्ये लिहिलं आहे. या महिलेला काय त्रास सहन करावा लागला असेल याची कल्पना करवत नाही. सुशिक्षित महिलेला असे पाऊल उचलावे लागत असेल तर सामान्य महिलांची काय परिस्थिती असेल? ज्यांच्याकडून सुरक्षेची हमी मिळाली पाहिजे तेच मारेकरी झाले तर काय करायचे? या नराधमांना फाशीची शिक्षा सुनावली पाहिजे. फास्ट ट्रॅक कोर्टात हे प्रकरण चालले पाहिजे. अशी मागणी देखील ॲड. सुभाष राऊत यांनी केली आहे.

## पत्रकार अविनाश कदम यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र परिवाराच्या वतीने व विविध मान्यवरांनी केला शुभेच्छांचा वर्षाव

**सामाजिक व पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वांच्या सेवेसाठी कायम कार्यरत राहणार : अविनाश कदम**

**आष्टी। प्रतिनिधी**

शहरासह तालुक्यात माझ्या संपर्कात आलेल्या प्रत्येकानेच आपल्यावर मनापासून प्रेम केले असून या प्रेमाची शिदोरी घेत आपण कार्यरत आहोत. यापुढेही समाजसेवा करीत आणि पत्रकार म्हणून सर्वांच्या सेवेसाठी अधिक जोमाने कार्यरत राहुत असा विश्वास आष्टी युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दै लोकमत, मराठवाडा साथीचे आष्टी तालुका प्रतिनिधी अविनाश कदम यांनी व्यक्त केला. दरम्यान मित्र परिवाराच्या वतीने व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कदम यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.

पत्रकार अविनाश कदम यांचा वाढदिवस २१ ऑक्टोबर रोजी आष्टी शहर व परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. दिवसभर विविध ठिकाणी वाढदिवसानिमित्त अविनाश कदम यांचा सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी बोलतांना पत्रकार अविनाश कदम यांनी सांगितले की, आष्टी शहरांसह तालुक्यातील नागरिकांनी व मित्र परिवार, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आपल्यावर मनापासून प्रेम असून मी एक पत्रकार म्हणून सर्वांसाठी जे शक्य आहे ते आपल्या सामाजिक कार्याच्या व लेखनीच्या माध्यमातून काम करण्याचा प्रयत्न केला आहे. आपले आशिर्वाद आणि सहकार्य माझ्या पुढील आयुष्यासाठी अत्यंत महत्वाचे असून यापुढेही आपल्या सेवेत अधिक जोमाने कार्यरत राहुत असा विश्वास पत्रकार कदम यांनी व्यक्त केला.आष्टी पाटोदा शिरूरचे आमदार सुरेश धस,माजी आ भिमराव धोंडे,माजी आ साहेबराव दरेकर, माजी आ बाळासाहेब आजबे,तहसीलदार वैशाली पाटील, शिवसेनेच्या नेत्या रेश्माताई जगताप, गटविकास अधिकारी गोकुळ बागलाणे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सतिश शिंदे, पोलिस निरीक्षक शरद भुतेकर, गटशिक्षणाधिकारी सीमा काळे यांच्यासह राजकीय व अधिकारी, सरपंच, उपसरपंच, शैक्षणिक, सामाजिक, संपादक, धार्मिक, पत्रकार आदी क्षेत्रांतील मान्यवरांनी व मित्र परिवार यांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, भ्रमणध्वनी, सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अंबाजोगाई सोशल मीडिया तालुका अध्यक्ष पदी शरद काळे यांची नियुक्ती

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अंबाजोगाई सोशल मिडिया तालुका अध्यक्ष पदी येथील धडाडीचे युवा कार्यकर्ते शरद काळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सदरील नियुक्ती ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सोशल मीडिया सेलचे प्रदेशाध्यक्ष आनंद पवार यांच्या आदेशाने तसेच पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण व माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या शिफारशीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अंबाजोगाई सोशल मीडिया तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. सदर नियुक्ती चे पत्र राजकिशोर मोदी व राष्ट्रवादी काँग्रेसचे अंबाजोगाई शहराध्यक्ष महादेव आदमाणे यांच्या उपस्थितीमध्ये शुक्रवार दि २४ रोजी देण्यात आले. यावेळी किशोर परदेशी, अमोल लोमटे, दिनेश भराडीया, कचरू सारडा, प्रकाश लखेरा, सुशील वाघमारे, शेख मुक्तार , अंकुश हेडे , मतीनं जरगर यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.



शरद काळे यांना दिलेल्या नियुक्ती पत्रात नमूद केले आहे की आपण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विचारधारेवर दृढ श्रद्धा ठेवून पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहात. शिव-शाहू-फुले-आंबेडकर व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्राचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री ना.श्री. अजितदादा पवार साहेब यांचे विचार व पक्षाची विचारधारा सर्वत्र पोहोचवण्यासाठी, डिजिटल माध्यमांवरील उपस्थिती वाढविणे, युवकांना जोडणे तसेच समाज माध्यमांमध्ये पक्षाची धोरणे व कार्यक्रम हे सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या हेतून आपण काम करत आहात. आपल्या या कार्यास आणखीन पाठबळ मिळण्यासाठी आपली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सोशल मीडिया सेलचे प्रदेशाध्यक्ष आनंदजी पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राजेश्वर (आबा) चव्हाण यांच्या मान्यतेने माजी नगराध्यक्ष राजकिशोरजी मोदी यांच्या शिफारशीने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अंबाजोगाई सोशल मीडिया तालुका अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

आपणास दिलेल्या जवाबदारीचा तसेच आपण आपल्या पदाचा कार्यकाळ प्रामाणिकपणे, जबाबदारीने व पक्षनिष्ठेने कार्य पार पाडाल अशी अपेक्षा देखील व्यक्त करण्यात आली आहे. याप्रसंगी शरद काळे यांना शुभेच्छा देताना राजकिशोर मोदी यांनी सध्याचा सोशल मीडिया हा समाजाचा आरसा बनू पहात आहे. त्यामुळे तरुणांनी सोशल मीडियाचा वापर अतिशय जाणीवपूर्वक व काळजी पूर्वक वापर करावा . आपल्या सोशल मीडियावरील एखादा मचकूर ज्याने समाजसमाजात तेड निर्माण होणार काही दक्षता घेण्याचे आवाहन याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी उपस्थित तरुणांना केले. यावेळी शहराध्यक्ष महादेव आदमाणे यांनी देखील शरद काळे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. शरद काळे यांना सोशल मिडिया अंबाजोगाई तालुकाध्यक्ष पदाचे नियुक्ती पत्र देतांना अकबर पठाण, जावेद गवळी, महेबूब गवळी, दत्ता सरवदे,खलील जाफरी, शाकेर काझी, रफिक गवळी, सुशील जोशी, सय्यद ताहेर, मुनिर शाह, पवन टेकाळे, अस्लम पठाण , रोहित हलगुंडे, सन्नि लखेरा यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. सोशल मिडियाच्या अंबाजोगाई तालुकाध्यक्ष पदी नियुक्ती झाल्याबद्दल शरद काळे यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.

## बीड नाळवंडी रस्त्यासाठी 15-16 गावांचा निवडणुकीवर बहिष्कार; लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे मतदारांमध्ये तीव्र संताप

**बीड । प्रतिनिधी**

बीड ते नाळवंडी रोड गेल्या १५ ते २० वर्षांपासून अत्यंत दुरवस्थेत असलेल्या नाळवंडी रस्त्याच्या प्रश्नाकडे लोकप्रतिनिधींनी सातत्याने दुर्लक्ष केल्याने, संतप्त झालेल्या परिसरातील १५ ते १६ गावांच्या ग्रामस्थांनी आगामी पंचायत समिती आणि जिल्हा परिषद निवडणुकीवर पूर्णपणे बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. प्रशासनाकडे आणि लोकप्रतिनिधींकडे वारंवार पत्रव्यवहार व निवेदने देऊनही या समस्येची दखल घेतली गेली नाही, त्यामुळे मतदारांमध्ये तीव्र संताप पसरला आहे. या परिसरातील नाळवंडी रस्ता अनेक वर्षांपासून पूर्णपणे खराब झाला आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत, ज्यामुळे ग्रामस्थांना दैनंदिन जीवनात अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात या रस्त्यावरून प्रवास करणे अत्यंत धोकादायक ठरते. आरोग्याच्या समस्या: वेळेवर रुग्णवाहिका गावात पोहोचू शकत नाही, त्यामुळे आरोग्यविषयक आपत्कालीन परिस्थितीत गंभीर परिणाम भोगावे लागले आहेत. खराब रस्त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी तसेच शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या वाहतुकीसाठी मोठा त्रास सहन करावा लागतो. ग्रामस्थांनी वेळोवेळी संबंधित ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य तसेच आमदार आणि खासदारांकडे रस्त्याच्या दुरुस्तीसाठी अर्ज केले. तसेच, प्रशासकीय पातळीवरही सातत्याने पाठपुरावा केला गेला. मात्र, प्रत्येक वेळी केवळ पोकळ आश्वासने मिळाली आणि रस्त्याचे काम झाले नाही. लोकप्रतिनिधींनी या ज्वलंत प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याने, आता मतदारांनी आपला लोकशाही हक्क वापरण्यास नकार देण्याचा कठोर निर्णय घेतला आहे.



## महाराणी ताराबाई कन्या विद्यालयातील माजी विद्यार्थिनींचा स्नेह मेळावा संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पूर्वीच्या महाराणी ताराबाई कन्या विद्यालयातील माजी विद्यार्थिनींचा स्नेह मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याबाबत अधिक माहिती अशी की,महाराणी ताराबाई कन्या शाळेतील शैक्षणिक वर्ष - २००४-०५ मधील एस.एस.सी. बॅच च्या माजी विद्यार्थिनींचा शुक्रवार दि. २४ ऑक्टोबर २०२५ रोजी तब्बल २० वर्षानंतर महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात स्नेह मेळाव्याचे (गेट-टुगेदर) आयोजन श्रीमती अंजली केशवराव आंधळे यांनी केले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक,सचिव तथा माजी आमदार केशवराव आंधळे तर प्रमुख पाहुण्या म्हणून



वडवणी पंचायत समितीच्या माजी सभापती सौ.सुलोचना केशवराव आंधळे,विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती एस.के आंधळे / डोईफोडे, सेवानिवृत्त प्राचार्य राऊत सर,उपप्राचार्य मस्के सर,श्री.धस सर , श्री.डोईफोडे सर,श्री.चोले सर,श्री. घोळवे सर,श्रीमती जवंजावळ मॅडम ,श्रीमती फलके मॅडम अदींजन मान्यवर म्हणून उपस्थित होते मान्यवरांवर पुष्पवृष्टी करून माजी विद्यार्थिनींनी स्वागत केले. मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. रोहिणी शिनगारे,अंजली मस्के,आम्रपाली मस्के, अश्विनी वखरे यांनी स्वागतगीत गाऊन मान्यवरांचे स्वागत केले. आम्रपाली मस्के,रोहिणी रावदाने, सीमा जाधव,रोहिणी अंकुशे,आशा आळणे, प्राध्यापिका स्वस्तिकश्री आगे या माजी विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतातून जुन्या आठवणींना उजाळा दिला तसेच प्राचार्य राऊत सर,उपप्राचार्य मस्के सर ,श्रीमती जवंजावळ मॅडम श्रीमती फलके मॅडम, श्री.डोईफोडे सर , प्राचार्या शोभाताई आंधळे मॅडम यांनी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपपर विचार व्यक्त करताना माजी आमदार केशवराव आंधळे म्हणाले की, ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाची दुरावस्था पाहून वडवणी येथे महाराणी ताराबाई कन्या शाळा सुरू केली आज दोनहजारापेक्षाही जास्त विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत आहेत प्रामाणिकपणे वागणाऱ्या व्यक्तींना जीवनात त्रास होतो हे खरे आहे पण आत्मिक समाधान त्यांना मिळत असते प्रामाणिकपणे राहिलो म्हणूनच मी आमदार झालो प्रामाणिकपणे तुम्ही पण काम करा असे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थिनींना केले. गेट-टुगेदर चा कार्यक्रम दोन सत्रामध्ये संपन्न झाला दुसऱ्या सत्रात संगीत-खुर्ची,तळ्यात- मळ्यात हे खेळ खेळण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती काळे,सरिता माळवदे यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोहिणी शिनगारे व कार्यक्रमातील उपस्थितांचे आभार अंजली केशवराव आंधळे यांनी मानले. आनंददायी वातावरणामध्ये स्नेहभोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● रविवार, दि. २६ ऑक्टोबर २०२५ ● पान ४



बीड तालुक्यातील मसेवाडी येथील अशोक मोरे ( सर) यांचे चिरंजीव सोहम अशोक मोरे याने महाराष्ट्र शासनाच्या दुर्गोत्सव २०२५ मध्ये सहभाग घेऊन सिंधुदुर्ग किल्ला बनवला. सोहमला माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्र शासन यांच्याकडून प्रमाणपत्र देखील मिळाले आहे. किल्ला पाहुन मसेवाडी येथील ग्रामस्थ संरपच उपसरपंच यांनी सोहम चे कौतुक केले असून सोहम मोरे इयत्ता ७ वीच्या वर्गात भगवान विद्यालय बीड येथे शिक्षण घेत असुन सोहम चे सर्वत्र कौतुक होत आहे

# आहेर चिंचोली येथील 85 शेतकऱ्यांना नामच्या मोफत बियाण्यांचे वाटप



## ॲड. अजित देशमुख यांच्या हस्ते वाटप

**बीड । प्रतिनिधी**

आहेर चिंचोली या गावाला पुराच्या पाण्याने मोठा तडाखा बसला होता. बंधाऱ्या लगत आणि नदी किनारी असलेल्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. तसेच नदीचे पात्र देखील बदलले होते. या गावातील ८५ शेतकऱ्यांना नाम फाऊंडेशन माध्यमातून आलेले मोफत बियाण्याचे वाटप स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड.अजित एम. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावर्षीच्या पावसाळ्यामध्ये पुराच्या पाण्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात हाल झाले. नाम फाऊंडेशनच्या वतीने पात्र शेतकऱ्यांची निवड करून त्यांना मोफत बियाण्याचे वाटप करण्याचे नियोजन ठरवण्यात आले होते. नाम फाऊंडेशनने बीड जिल्ह्यात एक हजार शेतकऱ्यांना मोफत बियाणे देण्याचे उद्दिष्ट ठरवले होते. हरभरा आणि ज्वारी या बियाण्यांचे वाटप करण्यात आले. चिंचोली गावचे रहिवासी ॲड. महादेव तुपे, ॲड. उमेश रकटे, तसेच ॲड बाळासाहेब गायकवाड, दिनकर सुरवसे पाटील यांनी विशेष सहकार्य केले. तसेच गणेश रकटे, संतराम चव्हाण, काशिनाथ सुरवसे, सुभाष काळे, कर्ण बहिर, भारत बहिर, रामनाथ सुरवसे, जनार्धन रकटे या आणि इतर शेतकऱ्यांना याचा लाभ देण्यात आला. शेतकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना नाम फाऊंडेशनचे आभार मानले.

## विक्री केलेल्या घराचे परत खरेदीखत करुन देण्यासाठी ऊसतोड मुकादमाला धमक्या

**अशोक ढाकणे व त्यांच्या नातेवाईकांसह मित्रावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची ऊसतोड मुकादम रामचंद्र घोळवे यांचे पोलिस निरीक्षकांना निवेदन**

**बीड । प्रतिनिधी**

अशोक उत्तम ढाकणे यांनी ऊसतोड मुकादम रामचंद्र घोळवे यांच्या सुनांना बीड नगर परिषदेच्या हद्दीतील घर विक्री केले. दरम्यान सदर विक्री केलेल्या घराचे खरेदीखत करुन पुन्हा परत करुन देण्यासाठी अशोक उत्तम ढाकणे व त्यांच्या नातेवाईक ऊसतोड मुकादम रामचंद्र घोळवे यांना वारंवार धमक्या देऊ लागले आहेत. त्यामुळे या त्रासाला कंटाळून श्री. घोळवे यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक अशोक ढाकणे व त्यांच्या नातेवाईकांसह मित्रावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनाद्वारे म्हटले आहे, की अशोक उत्तम ढाकणे याने त्याचे मालकी व ताब्यातील बीड नगरपरिषद हद्दीतील घर ऊसतोड मुकादम रामचंद्र घोळवे यांच्या स्नुषा नामे पल्लवी विलास घोळवे, सुरेखा कैलास घोळवे व वैशाली विजय घोळवे यांनी दिनांक १४.०९.२०१७ रोजी रक्कम रु.४५,६५,०००/- मध्ये खरेदी केलेले असून सदरचे खरेदीखताची रक्कम ही अशोक उत्तम ढाकणे यांना धनादेशाव्दारे अदा केलेली आहे. तसेच खरेदीखतानंतर अशोक उत्तम ढाकणे यांचे नावे असलेली बँक ऑफ इंडिया शाखा वासनवाडीचे कर्ज रक्कम रू.१५.९९,०००/- ची रक्कम ही बँकेने दिलेल्या पत्रावरून अशोक ढाकणे यांच्या कर्ज खात्यामध्ये दि.१३.१०.२०१७ रोजी घोळवे धनादेशाद्वारे भरणा केलेली आहे. सदर खरेदीखत करते वेळेस अशोक उत्तम ढाकणेंचा मुलगा, मुलगी, त्यांची पत्नी व त्यांचा भाऊ या सर्वांनी सदर नोंदणीकृत खरेदीच्या व्यवहारास लेखी संमती दिलेली आहे. ▶ उर्वरित पान २ वर

## शेतकऱ्यांसाठी केलेल्या मागणीला यश, ३० ऑक्टोबरपासून सोयाबीन नोंदणीला सुरुवात : शेतकरीपुत्र धनंजय गुंदेकर

**बीड । प्रतिनिधी**



गेल्या काही दिवसांपासून सोयाबीन हमीभाव नोंदणी व खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात यावी अशी मागणी राज्य सरकारकडे करण्यात आलेली होती. मात्र या मागणीकडे राज्य सरकारने अद्याप देखील लक्ष दिलेले नव्हते, काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत घोषणा केली आहे. नोंदणी मागणीला यश आले असले तरी खरेदी प्रक्रिया देखील तत्काळ सुरू करणे आवश्यक असल्याचे संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हटले आहे.

राज्यात सोयाबीनची खरेदी सुरु करण्याच्या हालचाली सुरु आहेत. राज्यात हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी ३० ऑक्टोबरपासून नोंदणी सुरु होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तर राज्य सरकारने केंद्राकडे १० लाख टन सोयाबीन खरेदीला मंजुरी देण्याची मागणी केली आहे. याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवला असून लवकरच मंजुरी मिळेल, अशी माहिती कळली आहे.

▶ उर्वरित पान २ वर

## सह्याद्री ऑर्थो केअर हॉस्पिटलचा शुभारंभ





**बीड । प्रतिनिधी**

सह्याद्री ऑर्थोकेअर हॉस्पिटल व निरामय आयुर्वेद चिकित्सालय रुग्णालयाचा स्थलांतर व नवीन वास्तूत शुभारंभ सोहळा दिनांक २२ ऑक्टोबर बुधवार रोजी संपन्न झाला. डॉ. प्रमोद शिंदे व डॉ. सुषमा प्रमोद शिंदे यांच्या या रुग्णालयाच्या उद्घाटनासाठी माजी मंत्री माननीय श्री शिवाजीराव दादा पंडित, नाशिक येथील प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. विजय काकतकर, डॉ.राकेश कनोजिया , माननीय आमदार विजयराजे पंडित, डॉ.अशोक जी थोरात, पप्पू जी कागदे, मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी माननीय महंत शिवाजी महाराज, माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या शुभ ▶ उर्वरित पान २ वर

## एकत्र काढून ठेवलेली सोयाबीन अज्ञात व्यक्तीने जाळली

**बीड । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील फुले पिंपळगाव येथील एका शेतकऱ्याने शेतातून काढलेली सोयाबीन एकत्र करून शेतामध्येच झाकून ठेवली होती. अज्ञात व्यक्तीने मध्यरात्री ही सोयाबीन जाळून टाकली असल्याची घटना घडली आहे या घटनेमुळे शेतकऱ्याचे हजारो

▶ उर्वरित पान २ वर

# तेलगाव जिल्हा परिषद निवडणुकीसाठी 'डीपीआय'ची आढावा बैठक संपन्न

**तेलगाव मधून मनीषा कांबळे यांचे नाव अजिंक्य चांदणें यांच्याकडून घोषित**

**दिंद्रुड । प्रतिनिधी**



**लोकसभा व विधानसभा निवडणुकीत डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडियाने युती धर्म पाळत कसलीही अपेक्षा न ठेवता महाविकास आघाडीचे काम केले. याचीच जाण राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार व खासदार बजरंग सोनवणे ठेवतील व आम्हास या निवडणुकीत न्याय देतील अशी अपेक्षा आहे. – अजिंक्य चांदणे , प्रदेशाध्यक्ष डी पी आय महाराष्ट्र राज्य**

जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे पडघम वाजले असुन, येत्या काही काळात होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया च्या वतीने उमेदवाराची चाचपणी चालू आहे. बीड जिल्ह्यातील तेलगाव जिल्हा परिषद गटासाठी मनीषा नवनाथ कांबळे यांच्या उमेदवारीची घोषणा डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी काल शुक्रवारी (दि.२४) सायंकाळी आयोजित आढावा बैठकीत केली.

महाविकास आघाडीसोबत डिपीआय हा पक्ष असून जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील राखीव गटांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्याकडे आपण मागणी करणार असल्याचे डीपीआयचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी तेलगाव येथील आढावा बैठकीत सांगितले. यात तेलगाव गटाच्या जागी आपण कुठल्याही परिस्थितीत निवडणूक लढवणार असून या भागात डीपीआयचे युवक जिल्हाध्यक्ष नवनाथ कांबळे यांच्या सुविद्य पत्नी मनीषा कांबळे यांच्या उमेदवारीची घोषणा अजिंक्य चांदणे यांनी शुक्रवारी सायंकाळी येथील आढावा बैठकीत केली. यावेळी बोलताना महाविकास आघाडीने आमचा विचार केला नाही तर आम्ही कुणाच्याही ताटाखालचे मांजर होणार नाही तर स्वबळावर या निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे ▶ उर्वरित पान २ वर



महाराष्ट्र राज्यस्तरीय ३६ किलो वजनी गटातील कुस्तीसाठी मुलीमधून ढाळेवाडी ता.पाटोदा येथील कु. प्रीतम श्याम हुले पाटील हिची निवड झाल्याबद्दल सत्कार करतांना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ऍड बापू जाधव, संजय गोडसे, अशोकराव सुरवसे, लक्ष्मण नरनाळे, दादासाहेब माने, बाबा टिपटे, लक्ष्मण बसवर, आदी.

## सोमवारी ह.भ.प. त्र्यंबक महाराज मातकर यांची ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बार्शी रोडवरील स्वराज्य नगर परिसरातील माऊली निवास्थान येथे दरवर्षीप्रमाणे या वर्षीही ह.भ.प. माधव महाराज डाके (काठवडेकर) यांच्या मार्गदर्शनाखाली चातुर्मास उत्सवाचे आयोजन भक्तिभावाने सुरू आहे. आषाढी एकादशीपासून ते कार्तिकी एकादशीपर्यंत चालणाऱ्या या चार महिन्यांच्या पवित्र चातुर्मास कालावधीत दर सोमवारी संध्याकाळी ८ ते ९ या वेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथप्रेमी कीर्तनकार व प्रवचनकार महाराज मंडळी ज्ञानेश्वरीतील अमृतमय विचारांचा वर्षाव करीत आहेत. या परंपरेचा पुढचा भाग म्हणून येत्या सोमवार, दिनांक २७ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री ८ ते ९ या वेळेत ह.भ.प. त्र्यंबक महाराज

▶ उर्वरित पान २ वर

# बीड जिल्ह्यात 24 ते 30 ऑक्टोबरदरम्यान विजांसह जोरदार पावसाचा इशारा



### ● शेतकऱ्यांनो सावधान – जिल्हा प्रशासनाकडून विविध सूचना

**बीड । प्रतिनिधी**

पुढील काही दिवस जिल्ह्यात पावसाचा जोर वाढणार असून २४ ऑक्टोबरपासून पावसाची तीव्रता वाढण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे . २६ ते ३० ऑक्टोबरदरम्यान बीड , पाटोदा , माजलगाव , अंबाजोगाई , धारूर , गेवराई , परळी , माजलगाव परिसरात विजा व मेघगर्जनेसह मध्यम ते जोरदार तसेच स्थानिक पातळीवर मुसळधार पावसाचा अंदाज आहे . बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रात तयार झालेल्या दोन कमी दाबाच्या प्रणालीमुळे राज्यात ट्रफ लाईन तयार होत असून पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता आहे . १ ते ४ नोव्हेंबरदरम्यानही विखुरलेल्या स्वरूपातील पावसाचा अंदाज असून ५ नोव्हेंबरपासून पावसाचा प्रभाव हळूहळू कमी होणार आहे . या पावसामुळे शेतकऱ्यांनी विशेष दक्षता घेणे अत्यावश्यक असल्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले . कापूस , सोयाबीन , ज्वारी अशा काढणी आलेल्या पिकांचे उत्पादन सुरक्षित साठवून ठेवावे , धान्य तसेच कापूस ओल्या ठिकाणी ठेवू नये आणि जनावरांची शेड सुरक्षित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या आहेत . विजांचा कडकडाट झाल्यास शेतात काम करण्यापासून दूर राहावे तसेच टॉवर , झाडे किंवा लोखंडी वस्तू जवळ उभे राहणे धोकादायक असल्याचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी नमूद केले आहे . नाले – ओढ्यांमध्ये अचानक पाणी ▶ उर्वरित पान २ वर